नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@yahoo.com

परभणी कृषि हवामान सल्ला **मंगळवार, दिनांक – ०६.१०.२०२०**

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक ०७ ते ११ ऑक्टोबर, २०२०)				
दिनांक	०७/१०	०८/१०	०९/१०	१०/१०	११/१०
पाऊस (मिमी)	००.०	००.०	००.०	०९.०	०८.०
कमाल तापमान (अं.से.)	३५.०	३५.०	३४.०	३५.०	३४.०
किमान तापमान (अं.से.)	२१.०	२२.०	२३.०	२४.०	२४.०
ढग स्थिती (आकाश)	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	६५	५९	६६	८८	९०
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	३४	३१	४१	५४	६१
वा-याचा वेग (किमी / तास)	०८	०४	०७	०५	०६
वा-याची दिशा	वायव्य	पूर्व	आग्नेय	दक्षिण	दक्षिण

हवामानाचा इशारा	परभणी जिल्हयात पुढील पाच दिवसात आकाश ढगाळ राहून दिनांक १० व ११ ऑक्टोबर २०२० रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात दिनांक ०७ ते ०९ ऑक्टोबर २०२० या कालावधीत कोरडया हवामानाची शक्यता असल्यामुळे काढणीस तयार असलेल्या सोयाबीन पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
कापूस	पाते लागणे, फुलधारणा ते बोंड वाढीची अवस्था	कापूस पिकात दहीया रोगाच्या व्यवस्थापनासाठी ॲझोक्सिस्ट्रॉबीन + डायफेनोकोनॅझोल १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. तसेच कापूस पिकात आंतरिक बोंड सड याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन २ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. सध्याच्या कोरडया हवामानामूळे कापूस पिकात रसशोषन करणा-या किडींचा (मावा, तुडतूडे, फुलकिड) प्रादुर्भाव दिसून ये असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी निंबोळी अर्क ५% किंवा फिप्रोनील ५% ६०० मिली किंवा स्पिनेटोरम ११.७% १६० मिली किंवा बुप्रोफेंझीन २५% ४०० मिली प्रती एकर पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
तुर	फांदया फुटणे	तुर पिकात पाने गुंडाळणा-या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी प्रादुर्भावग्रस्त पाने गोळा करून नष्ट करावीत व ५% निंबोळी अर्काची पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
रब्बी ज्वारी	वाणांची निवड	रब्बी ज्वारी पेरणीसाठी परभणी सुपर मोती (एसपीव्ही-२४०७), परभणी मोती (एसपीव्ही-१४११), परभणी ज्योती (एसपीव्ही-१५९५/एसपीव्ही-१८), मालदांडी (एम ३५–१) इत्यादी वाणांपैकी एका वाणाची निवड करावी.
सुर्यफूल	वाणांची निवड	सुर्यफूल पिकाच्या पेरणीसाठी एसएस– २०३८, मॉडर्न, एलएस-८, एलएसएफएच–१७१, एलएसएफएच-३५ इत्यादी वाणांपैकी एका वाणाची निवड करावी.

रब्बी भुईमूग	वाणांची निवड	रब्बी भुईमूग पेरणीसाठी एसबी-११, जेएल-२४, एलजीएन-२, टीअेजी-२४ इत्यादी वाणांपैकी एका वाणाची निवड करावी.
द्राक्ष	छाटणीपूर्व अवस्था	द्राक्ष बागेत ऑक्टोबर छाटणीची पूर्व तयारी करावी.
केळी	वाढीची अवस्था	केळी बागेतील तणांचे व्यवस्थापन करावे. केळी बागेत ५० ग्रॅम नत्र व ५० ग्रॅम पालाश प्रती झाड खतमात्रा दिली नसल्यास दयावी.
आंबा	वाढीची अवस्था	आंबा बागेतील तणांचे व्यवस्थापन करावे.
सिताफळ	फळवाढीची अवस्था	सिताफळ बागेतील तणांचे व्यवस्थापन करावे.
भाजीपाला	वाढीची अवस्था	कांदा पिकावरील करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेबुकोनॅझोल २५.९% ईसी १०मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाउ दिल्यास फवारणी करावी. भेंडी पिकावरील पांढरी माशीच्या व्यवस्थापनासाठी फेन्प्रोपॅथ्रीन ३०% ईसी ३.५ मिली किंवा ऑक्सीडिमेटॉन मिथाईल २५% ईसी २० मिली किंवा थायामिथॉक्झाम २५% डब्ल्युजी २ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
फुलशेती	वाढीची अवस्था	काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी करून घ्यावी. पावसाने उघाड दिल्यामुळे फुलपिकातील तणांचे व्यवस्थापन करावे.
पशुधन व्यवस्थापन	--	मुबलक पाऊस व त्यामुळे वाढणारे बाहयपरिजीवी (ऊवा, पिसवा, गोचीड व चावणा-या किटकवर्गीय माशा) यांचा प्रादुर्भाव पशुधनास त्रस्त करत आहे. म्हणून पशुपालकांनी या कालावधीमध्ये ५% निंबोळी अर्क किंवा वनस्तीजन्य किटकनाशक (कडूनिंबतेल १५ मिली + कारंज तेल १५ मिली + २ ग्रॅम मऊ साबण + १ लिटर पाणी) हे द्रावण आठवडयाच्या अंतराने पशुधनावर, गोठयामध्ये, सभोवताली असलेले पाण्याचे डबके / खाच खळगे/ नाली व शेणाच्या ढिगा-यावरती फवारावे. हे वनस्तीजन्य किटकनाशक किटकरोधक व किटक/ गोचीडांचे जिवनचक्र तोडून त्यांची संख्या घटवण्यासाठी मदत करते.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.